# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 14/01/2023 (शनिवार) दुपार**

## चोरी

**पो.स्टे. वेलतूर** :– अंतर्गत २० कि.मी. अंतरावर मौजा ठाणा येथे दिनांक ०९/०१/२०२३ चे १२.३९ वा. दरम्यान यातील दोन्ही आरोपी नामे– ०१) राजेश तिवसकर, रा. मांढळ ०२) दिगांबर बंडुजी ढेंगे, रा. मांढळ यांनी संगणमत करून महसूल विभागाची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता मौजा ठाणा शिवार येथील शेतमालक नामे– बाळा सिताराम उके यांचे मालकिचे शेतात उत्खनन केलेल्या जागेचे मोजमाप करून खड्डयाची लांबी ११ मीटर, रूंदी ९ मीटर व उंची १ मीटर एवढी आढळून आल्याने ३५ ब्रास माती किंमती अंदाजे १,७५,०००/– रूपयाची जेसीपी व पोकलॅण्ड मशीन व ट्रक क्र. एम.एच.–४९ ए.टी.–३३४७ चे सहाय्याने अवैदयरित्या उत्खनन करून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजेश शंकरराव बारापात्रे, वय ४७ वर्ष, रा. तहसील कार्यालय कुही यांचे रीपार्ट वरून पो.स्टे. वेलतूर येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीतांचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ४६१ रविंद्र फरकाडे पो. स्टे. वेलतूर मो. नं. ९८२२७६७८३३ हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत १४ कि मी अंतरावरील राजीव गांधी क्रिडा संकुल मोहपा येथे दिनांक १२/०१/२०२३ चे १६.०० ते १६.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– राजकुमार रामचंद्र गुजेवार, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र. ०२, गवळीपुरा, मोहपा हा चिंचेच्या झाडाखाली बसला असता यातील आरोपी नामे– संजय देशमुख (पाटील), वय ४५ वर्ष, रा. मोहपा हा दारू पिऊन आला व फिर्यादी सोबत दारूच्या नशेत वादविवाद केला व खाली जमिनीवर पडलेल्या विटेचा तुकडा हातात पकडुन फिर्यादीच्या डोक्यावर डाब्या बाजुला मारून फिर्यादीला जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३२५ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपासी ग्रेड पीएसआय नागपूरे मो. नं. ८८८८८२१३६० हे करीत आहे.

# विनयभंग

**पो.स्टे. बुट्टीबोरी :-** दिनांक ०६/१२/२०२२ चे ७.०० वा. पासून ते ०५/०१/२०२३ चे ७.०० वा. दरम्यान फिर्यादी वय १५ वर्ष व आरोपी नामे- अनुज रामसजिवन वर्मा, रा. बुटीबोरी हे दोघेही बालाजी कॉन्व्हेंट मध्ये इयत्ता १० वी मध्ये शिक्षण घेत असुन दिनांक ०६/१२/२०२२ ला आरोपी याने क्लास मध्ये फिर्यादीला हळू आवाजात आयलव्हयु म्हणून प्रपोज केले. क्लास सुरू असल्याने त्याचेकडे कोणाचेही लक्ष नव्हते त्यामुळे फिर्यादीने लक्ष दिले नाही व कोणालाही सांगीतले नाही. टयुशनला जात असतांना वाटेत आरोपी हा मागेमागे आला व म्हणाला ''तु जर हो नाही म्हणाली तर सुसाईड करीन व तुझे नावाची सुसाईड नोट लिहून ठेवीन'' अशी धमकी दिली. त्यानंतर मोबाईल वर इंस्टाग्राम वर मॅसेज केला ''तु का ठरवले आहे'' तेव्हा फिर्यादीने घाबरून त्याची भिती वाटल्याने फिर्यादी त्याला हो म्हणाली. तेव्हापासून तो वारंवांर मॅसेज करून फोन कर अस म्हणायचा. नाही करत म्हणाली तर शिवीगाळ करून धमकी दयायचा. दि. ०५/०१/२०२३ ला प्रॅक्टीकल सुरू होते फिर्यादी ही लॅब मध्ये होती तेव्हा आरोपी हा जवळ आला व फिर्यादीला बुक्की मारली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बुट्टीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३५४(ड), ५०४, ५०६ भादवि. सहकलम १२ बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. रेजीवाड मॅडम मो. क्र. ९८३४८२५७९३ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**